**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २२ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आजपासून लागू झालेल्या जीएसटी सुधारणा देशाच्या आर्थिक विकासाला गती देणार- माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन.**
2. **विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी सोहळा माजी राष्ट्रपती डॉ.रामनाथ कोविंद यांच्या उपस्थितीत होणार संपन्न.**
3. **शारदीय नवरात्रौत्सवाला आजपासून प्रारंभ, राज्यासह विदर्भातील देवस्थानांवर भक्तांची गर्दी.**
4. **बुलढाणा जिल्ह्यात पाडळी इथं ढगफूटी सदृश पावसामुळं शेतपिकांचं नुकसान.**

---------------------------------------

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव

आजपासून लागू झालेल्या पुढील पिढीतील जीएसटी सुधारणा देशाच्या आर्थिक विकासाला गती देतील असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं. आज नवी दिल्लीतील पक्ष मुख्यालयात पत्रकारांशी बोलताना वैष्णव म्हणाले की, जीएसटी सुधारणांमुळे जीडीपीमध्ये सुमारे २० लाख कोटी रुपयांची वाढ होईल. या शिवाय व्यापऱ्यांपासून ते सामान्य नोकरदार देखील सुखावतील -

***(होल्ड बाइट- माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव- 26 सेकंद)***

***(पवित्र नवरात्रि का शुभारंभ हो रहा है, साथ ही साथ जीएसटी का बड़ा बचत उत्सव भी आरंभ हो रहा है. जीएसटी की रेट्स को कम करना 99% हमारे जो डे-टू-डे यूज़ की चीजें हैं, उसके ऊपर जीएसटी में कमी आयेगी चाहे रसोई के सामान में, खाने पीने के सामान में, चाहे कपड़े ,चाहे बच्चों की पढ़ाई का सामान, चाहे घर के अंदर टीवी खरीदना, हो करके इन सब चीजों में बड़ी बचत जीएसटी के इस ऐतिहासिक फैसले से आएगी।)***

---------------------------------------

विजयादशमी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

विजयादशमीच्या दिवशी अर्थात 2 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपली शताब्दी साजरी करत आहे. या प्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमासाठी माजी

राष्ट्रपती डॉ.रामनाथ कोविंद उपस्थित राहणार असल्याची माहिती अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी आज डॉ.हेडगेवार स्मृती मंदिर परिसरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. देशभरातून या विशेष कार्यक्रमासाठी नेहमीपेक्षा तीन पट स्वयंसेवक उपस्थित राहतील, असं त्यांनी सांगितलं. शताब्दी सोहळ्यानिमित्त नागपूरमध्ये 27 सप्टेंबर रोजी पहिल्यांदाच तीन भागांमधून पथसंचालन केलं जाईल. या पथसंचालनाचा समारोप सिताबर्डी येथील व्हरायटी चौकात होईल. ज्याचं अवलोकन सरसंघचालक डॉ.मोहन भागवत करतील. संघाच्या पंच परिवर्तन कार्यक्रमाचा भाग म्हणून मंडळ तसच वस्ती स्तरावर हिंदू संमेलनाचं आयोजन केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे स्वयंसेवकांद्वारे गृह संपर्क अभियान देखील राबविलं जाणार असल्याची माहिती आंबेकर यांनी दिली .संघाच्या शाखा ८३ हजार झाल्या असून व्यक्ती निर्माण आणि संघटन शक्ती या कार्यात संघ नेहमी कार्यरत राहील. विजयादशमीच्या दिवशी सरसंघचालकांच उद्बोधन होणार असून हा सोहळा बघण्यासाठी देश विदेशातील तसच गणमान्य अतिथींना आमंत्रित करण्यात आल्याचंही आंबेकर यांनी सांगितलं.

---------------------------------------

सेवा पर्व-स्मार्ट सिटी

सेवा आणि सुशासन, म्हणजेच सार्वजनिक सेवा आणि सुशासन या मंत्रान मार्गदर्शित, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. 'सेवा पर्व' या विशेष मालिकेत आज स्मार्ट सिटी मिशनद्वारे केंद्र सरकार शहरी विकास आणि नागरिकांच्या जीवनमानात करत असलेल्या सुधारणांबाबत माहिती देत आहोत -

***होल्ड बाईट-***

***(व्हीसी- नम्रता फलके - १ मिनिट ३० सेकंद)***

***(स्मार्ट सिटी मिशन भारताच्या शहरी क्षेत्राला आकार देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जून २०१५ मध्ये सुरू केलेल्या या उपक्रमाच उद्दिष्ट स्मार्ट आणि शाश्वत उपायांद्वारे शहरांमधील जीवनमान सुधारण असं आहे. पुण्यात स्मार्ट सिटी प्रकल्प सुरू करताना पंतप्रधान म्हणाले की, स्मार्ट सिटी संकल्पना स्वतःच एक जन चळवळ आहे...)***

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

*ये स्मार्ट सिटी कॉन्सेप्ट ये सिर्फ इस काम के लिए इतने पैसे दिए जाएंगे वो नहीं है। ये अपने आप में एक बहुत बड़ा जन आंदोलन है। ये बीते हुए कल के अनुभव के आधार पर उज्ज्वल भविष्य की नींव रखने का एक सार्थक प्रयास है।*

*(गेल्या दशकात, स्मार्ट सिटी मिशनद्वारे उल्लेखनीय प्रगती झाली आहे. आठ हजारांहून अधिक प्रकल्पांपैकी सुमारे ९४ टक्के प्रकल्प आता पूर्ण झाले आहेत. या व्यतिरिक्त, १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे प्रकल्प अंमलबजावणीच्या अंतिम टप्प्यात आहेत, ज्यामुळ मिशन अंतर्गत एकूण गुंतवणूक सुमारे १ पूर्णांक ६४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचेल. या उपक्रमात विशिष्ट झोनचा पुनर्विकास केला जात आहे. याशिवाय शाळांतील वर्गखोल्या डिजिटल करणं, वारसा स्थळांचं पुनरुज्जीवन, आणि रस्ते प्रकाशित आणि सुरक्षित होत आहेत. आधुनिक रस्ते, सायकल ट्रॅक आणि ग्रीन कॉरिडॉरपासून ते प्रगत इंटग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरपर्यंत, हे प्रकल्प शहरांच्या कार्यपद्धतीला आकार देत आहेत. स्मार्ट सिटी मिशनला दहा वर्षे पूर्ण होत असताना, त्याचा सकारात्मक परिणाम देशभर दिसून येत आहे.)*

---

पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज'

विजेच्या वाढत्या दरांनी त्रस्त झालेल्या विदर्भातील नागरिकांसाठी 'पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज' योजना एक क्रांती ठरली आहे. ही योजना ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्याची संधी देत असून आतापर्यंत विदर्भातील १ लाख १४ हजार ९७८ कुटुंबांनी या योजनेत सहभाग घेऊन त्यांच्या घराच्या छतावर सौर पॅनेल बसवले आहेत, ज्यामुळे तब्बल ४४२ पूर्णांक ७ मेगावॅटची वीज निर्मिती क्षमता निर्माण झाली आहे, अशी माहिती महावितरण तर्फे देण्यात आली आहे.

---

नवरात्र उत्सव- विदर्भ

शारदीय नवरात्र उत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. ही नवरात्री खास असून, जीएसटी बचतच्या उत्सवासोबतच, स्वदेशीचा मंत्र या काळात एक नवीन ऊर्जा प्राप्त करेल. विकसित आणि स्वावलंबी भारताचा आपला संकल्प साध्य करण्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊया, असं पंतप्रधान म्हणाले. राज्यात तुळजापूरचं भवानी मंदिर, कोल्हापूरचं महालक्ष्मी मंदिर, माहुरचं रेणुका माता मंदिर, तसंच वणीच्या सप्तशृंगी देवी मंदिरामध्ये नवरात्रोत्सवा निमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे.

नागपुरात कोराडी इथल्या महालक्ष्मी मंदिरात देखील नवरात्र उत्सवाची जोरदार तयारी झाली असून त्यासाठी वाहतूक व्यवस्था, ऑनलाइन दर्शन व्यवस्था अश्या अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्या आहे. नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री आणि महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नवरात्र उत्सवाच्या पहिल्या दिवशी श्री महालक्ष्मी जगदंबा मातेची पूजा आणि आरती करण्यात आली. नागपूरच्या आग्याराम देवी मंदिरात देखील अखंड ज्योत सह विविध पूजा-अर्चना होत आहे. याशिवाय ठीकठिकाणच्या देवी मंदिरात भाविकांची दर्शनसाठी लगबग दिसून येत आहे. विदर्भाचं कुलदैवत असलेल्या अमरावतीच्या अंबादेवी संस्थानात पहाटे पासुन दर्शनासाठी भविकांची मोठी गर्दी दिसृन येत आहे. नऊ दिवस अंबादेवी संस्थान परिसरात नवरात्रोत्सवानिमित्त मोठी यात्रा भरते.

---------------------------------------

आयुर्वेद दिन

आयुर्वेद दिवसाच उद्दिष्ट आयुर्वेदाला जागतिक आरोग्य क्षेत्रात अग्रभागी आणण, राष्ट्रीय आरोग्य धोरणात योगदान देण, मृत्यूदर कमी करण तसच मनुष्य, प्राणी, वनस्पती आणि पर्यावरणासाठी समग्र आरोग्य दृष्टिकोन प्रस्थापित करण्याचं आहे, असं प्रतिपादन नागपूरच्या क्षेत्रीय आयुर्वेद अनुसंधान संस्थानचे प्रभारी सहायक संचालक डॉ.एम.एन.सुर्यवंशी यांनी केलं. क्षेत्रीय आयुर्वेद अनुसंधान संस्थान, इथं 10व्या आयुर्वेद दिवसानिमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले, त्या अनुषंगान घेतलेल्या पत्रकार परिषदेत सूर्यवंशी बोलत होते.

***(होल्ड बाईट - डॉ.एम. एन. सुर्यवंशी ३२ सेकंद)***

***इस साल का जो थीम है जन-जन के लिए आयुर्वेद और पृथ्वी के कल्याण के लिए आयुर्वेद खास करके प्रोत्साहन और प्रतिष्ठा देना यह आयुर्वेद का उद्देश्य है, राष्ट्रीय नीति में आयुर्वेद की चिकित्सा पद्धति और संभावना को लाना आयुर्वेद के लिए जो रुग्णता की कमी मतलब डिसीज की कमी और डिसीज लोड जो है उसमें कमी होना, समग्र स्वास्थ्य की संकल्पना करना और विश्वास को बढ़ावा देना, स्वास्थ्य तक उसकी देखभाल करना आयुर्वेद का मुख्य उद्देश है उसके अनुरूप हम आयुर्वेद दिवस मनाते हैं।***

यंदाच्या आयुर्वेद दिवसाची मध्यवर्ती संकल्पना “जनसामान्यासाठी आणि पृथ्वीच्या कल्याणासाठी आयुर्वेद” ही आहे. त्याअनुषंगान 10 सप्टेंबरपासून विविध

उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आलेल्या आयुर्वेद दिवसाचा समारोप उद्या होत आहे, अशी माहिती सुर्यवंशी यांनी दिली.

---------------------------------------

हवामान/ढग फुटी सारखा पाऊस

बुलढाणा जिल्ह्यातील पाडळी तालुक्यातील मढ परिसरात आज सकाळी ढगफुटी सारखा पाऊस झाल्यानं शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेलं पीक पाण्या खाली गेलं आहे. परिसरातील ओढे, नाले देखील ओसंडून वाहत आहेत. पैनगंगा नदीची जल पातळी धोक्याच्या इशाऱ्यापर्यन्त वाढली आहे. शेत शिवार जलमय झाली आहेत. आज संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे, तर उद्या आणि परवा पूर्व विदर्भाच्या जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, येत्या काही तासात विदर्भात बहुतांश जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

---------------------------------------

मान्सून माघार

राजस्थानच्या अर्ध्या भागातून मान्सून परतला असून पंजाब, गुजरात मधूनही त्याची माघार सुरू झाली आहे. तरीही मध्य प्रदेशात पावसाची तीव्रता कायम आहे आणि पुढील दहा दिवस या राज्यात जोरदार सरींचा अंदाज हवामान विभागान वर्तवला आहे.

---------------------------------------

नाव नोंदणी अर्ज

राज्यात फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज दाखल करण्यासाठी येत्या ३० तारखेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत देण्यात आली आहे.

---------------------------------------